**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.177, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, JAN–FEB, 2018, VOL- 5/43*

# उद्योजकता विकासासाठी जीवनकौशल्ये शिक्षण: काळाची गरज

**प्राध्या. श्री. ननवरे किरण वि.**

*सहायक प्राध्यापक, अभिनव शिक्षणशास्त्र महाविद्यालय, आंबेगाव बु., पुणे.*

**_Abstract_**

*गेल्या पन्नास वर्षांचा जगाचा इतिहास पाहिला तर विकसित राष्ट्रांच्या प्रगतीचा मुलाधार म्हणजे उद्योजकता, आणि उद्योजकतेसाठी आवश्यक कला-कौशल्यांचा विकास करणारी मुख्य प्रक्रिया शिक्षण. म्हणूनच शिक्षणप्रक्रिया व उद्योजकता यांच्यामधील परस्परसंबंध हा घनिष्ठ आहे. जागतिक महासत्ता होण्याची स्वप्ने पाहणा-या भारताकडे आज विपूल प्रमाणात मनुष्यबळ आहे. मात्र उपलब्ध मनुष्यबळ हे कुशल नाही. जर ही परिस्थिती बदलावयाची असेल तर, शिक्षणप्रक्रियेत वेळोवेळी नवनवीन संकल्पनांचा समावेश करणे अपरिहार्य. यापैकीच एक संकल्पना म्हणजे ''जीवनकौशल्यांचे शिक्षण'' होय. व्यक्तिला स्वतःचा व कुटूंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी एका अर्थाने जीवन जगण्यासाठी आवश्यक कलेचे,व्यवसायाचे, कौशल्यांचे शिक्षण हे शालेय शिक्षणापासूनच सुरू होणे गरजेचे आहे. यातूनच उद्याच्या यशस्वी उद्योजकतेची पायाभरणी होणार आहे. तसेच उद्योजकता ही काही ठराविक क्षेत्राची मक्तेदारी नाही, सुशिक्षित, अशिक्षित , श्रीमंत , गरीब हया सर्वांमध्येच ती असू शकते. म्हणजेच ''योजकता आणि उपक्रमशीलता यांचा सुरेख संगम म्हणजे उद्योजकता आणि हा संगम ज्या व्यक्तिमध्ये झालेला आहे अशी व्यक्ती म्हणजे उद्योजक.*

***मुख्य संकल्पना:*** *उद्योजकता , जीवनकौशल्ये , विकास , डेलॉर्स कमिशन, अभ्यासक्रम ,शिक्षक प्रशिक्षण आणि शिक्षण प्रक्रिया.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

जागतिक महासत्ता होण्याची स्वप्ने पाहणा-या भारताकडे आज विपूल प्रमाणात मनुष्यबळ आहे. जागतिक स्तरावर ''सर्वात जास्त तरूणांचा देश'' म्हणून ओळखले जात आहे. मात्र याच देशात बेकारी, दारिद्रय हे सर्वात मोठे प्रश्न आहेत, कारण उपलब्ध मनुष्यबळ हे कुशल नाही. याची कारणे भारतीय शिक्षणप्रणालीत दडलेली आहेत. भारत स्वतंत्र झाल्यापासून

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

राष्ट्ीय स्तरावर शिक्षणासाठी वेळोवेळी अनेक शैक्षणिक आयोग स्थापन कण्यात आले, मात्र त्यांनी केलेल्या शिफारशी बहुतांशी धूळ खत पडलेल्या आपणास दिसून येतात.

जर ही परिस्थिती बदलावयाची असेल तर, शिक्षणप्रक्रियेत कालानुरूप योग्य तो बदल करणे गरजेचे आहे, जरी तो केला जात असला तरी अपेक्षा व त्यांच्या पूर्ततेसाठीचा बदल यात फार मोठी तफावत असलेली दिसून येते. यासाठी शिक्षणप्रक्रियेत वेळोवेळी नवनवीन संकल्पनांचा समावेश करणे अपरिहार्य आहे. यापैकीच एक संकल्पना म्हणजे ''जीवनकौशल्यांचे शिक्षण'' होय.

व्यक्तिला स्वतःचा व कुटूंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी एका अर्थान जीवन जगण्यासाठी आवश्यक कौशल्ये त्याच्या मूलभूत शिक्षणातून मिळणे गरजेचे आहे.कोणत्याही कलेचे,व्यवसायाचे, कौशल्यांचे शिक्षण हे शालेय शिक्षणापासूनच सुरू होणे गरजेचे आहे. तरच यातूनच उद्याच्या यशस्वी उद्योजकतेची पायाभरणी होणार आहे. उदाः डॉक्टर्स, इंजिनिअर्स, वकील, शिक्षक, अर्थात संपूर्ण भावी समाज जो आपल्या क्षेत्राशी निगडीत मुलभूत उद्योजकता कौशल्यानी परिपूर्ण असेल.

जागतिक आरोग्य संघटनेने यशस्वी व समृध्द जीवन जगण्यासाठीची आवश्यक जीवनकौशल्ये शालेय शिक्षणातून विकसित करण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे 1997 च्या ''जागतिक आरोग्य परिषदेत'' मांडली. त्यानूसार सर्व सभासद राष्ट्ांना उद्देशून सांगण्यात आले की, राष्ट्रीय विकासाचा प्रमुख आधार असलेल्या शिक्षणप्रक्रियेतूनच ही जीवनकौशल्ये शालेय वयापासून विद्यार्थ्यांमध्ये रूजविली गेली तर जागतिकीकरणाच्या युगास सामोरे जाण्यासाठी एक समर्थ युवा पिढी निर्माण होईल, जी राष्ट्ाच्या प्रगतीस हातभार लावेल. यासाठी जीवनकौशल्ये विकसित करण्यासाठीच्या धर्तीवर अभ्यासक्रम रचना करण्यात यावी, जो विद्यार्थ्याला सुखी, समृध्द व यशस्वी जीवन जगण्यासाठीची कौशल्ये निर्माण करेल.

जीवनकौशल्यांद्वारे व्यक्तिच्या अंगी कोणत्याही क्षेत्रासाठी असणारी म्हणजेच यशस्वी जीवन जगण्यासाठी आवश्यक मुलभूत कौशल्ये विकसित करता येतील. यासाठीच भारत

सरकारने राष्ट्र्ीय स्तरापासून ते स्थानिक पातळीपर्यंत जीवनकौशल्यांच्या शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात केलेला आपणास दिसून येतो. ही जीवनकौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्यासाठी गरज आहे ती जीवनकौशल्याधारीत अध्ययन -अध्यापनाची. सन 2005 च्या राष्ट्र्य अभ्यासक्रम अराखडयानुसार ज्ञानरचनावादी दृष्टिकोनानुसार ही जीवनकौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये अधिक चांगल्या प्रकारे रूजविता येतील.

- **जीवनकौशल्ये :**

''दैनंदिन जीवनात निर्माण होणा-या विविध समस्या व गरजांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी व्यक्तिने स्वतःच्या वर्तनात स्विकारात्मक व सकारात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता म्हणजे जीवनकौशल्ये होय''. ***- जागतिक आरोग्य संघटना 1997***

- **जीवनकौशल्यांचे शिक्षण :**

''ज्या शिक्षण पद्धतीतून मानसिक कौशल्यविकसनासाठी योग्य सांस्कृतिक व विकसित मार्गांचा अवलंब करून अधिक साराव व प्रेरणा दिली जाते तसेच मानवी हक्कांचे संरक्षण होउन आरोग्यविषयक व सामाजिक समस्यांपासून दक्षता घेउन त्यामधून वैयक्तिक व सामाजिक विकासाला चालना मिळते त्या शिक्षणाला जीवनकौशल्यांचे शिक्षण असे म्हणतात''.

गाभाभूत घटक व मूल्ये ही राष्ट्र्ीय गरज तर जागतिकीकरण , उदारीकरण, खाजगीकरणाच्या युगाला समर्थपणे सामोरे जाण्यासाठी जीवनकौशल्यांची गरज. जागतिकीकरणासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यात जीवनकौशल्ये मोलाचे योगदान देतात. जीवनकौशल्ये ही व्यक्तिला वैयक्तिक,स्थानिक पातळीपासून ते जागतिक पातळीपर्यंत जीवन जगण्यासाठी मुलभूत कौशल्ये विकसित करण्यास मदत करतात.

जागतिक आरोग्य संघटनेने सांगितल्याप्रमाणे शालेय शिक्षणात एकूण दहा जीवनकौशल्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. यानुसार सन 2008 पासून पाठयपूस्तक निर्मिती सुध्दा करण्यात आलेली आहे. यानूसार शिक्षकांनी पाठांखाली दिलेल्या उपक्रमांद्वारे ही

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

जीवनकौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्याचा प्रयत्न अध्यापन व विविध उपक्रमांद्वारे करावा असू सूचित करण्यात आले आहे. या **दहा** जीवनकौशल्ये **प्रमुख पाच विभागात वर्गीकरण** करण्यात आलेले असून ते खालीलप्रमाणे :

1. स्वःची जाणीव व समानानुभूती
2. समस्या निराकरण व निर्णयक्षमता
3. चिकित्सक विचार व सर्जनशील विचार
4. निकोप आंतरमानवीय संबंध व परिणामकारक संप्रेषण
5. भावनांचे समायोजन व ताण-तणावांचे समायोजन

वरील पाच विभागात विभागलेली ही दहा जीवनकौशल्ये व्यक्तीच्या, विद्यार्थ्यांच्या मानसिक व सामाजिक विकासात मोलाचे योगदान देतात. शालेय शिक्षणातून या जीवनकौशल्यांद्वारे विद्यार्थ्यांच्या मानसिक , समाजिक क्षमता , कौशल्ये व दृष्टिकोन विकसित करण्यावर भर देण्यात येतो.

- **उद्योजकताः - ;**

उद्योजकता म्हणजे व्यावसायिकता असे आपण सर्वसामान्यपणे अर्थ घेतो. मात्र या दोन संकल्पनांमध्ये खूप मोठा मूलभूत फरक असलेला आपणाला दिसून येतो.

आपल्या नेहमीच्या ज्ञान असेलेल्या व्यापार/व्यवसाय या संकल्पनेपासून उद्योजकता अगदी भिन्न आहे, विस्तृत आहे, व्यापारी वृत्ती ज्याच्यामध्ये बाणलेली असते ती व्यक्ती चलाख, हुशार, चाणाक्ष, सुयाग्य संधीचा /परिस्थितीचा लाभ उठवणारी असावी लागते. अर्थात हयासाठी त्या व्यक्तिला सभेवतालच्या परिस्थितीकडे काकदृष्टिनेच नजर ठेवावी लागते.

उद्योजकता ही मात्र एक आगळीच वृत्ती आहे. उद्योजकामध्ये व्यापरी वृत्तीसाठी आवश्यक असणारे गुण तर अंगी असावे लागतातच परंतु त्यांच्याच बरोबरीने नवनिर्मितीची योजनापर्वक सांगड जर उद्योगविषयक ज्ञानाशी घातली तर उद्योजकतेचा अविष्कार दिसून येतो.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

- **व्याख्या :**

''नवीन कल्पना व संधी शोधून , व्यावसायिक अनिश्चिततेत आर्थिक धोका पत्करून स्वतःच्या अंगातील संघटन कौशल्याने, सुनियोजित पध्दतीने उपक्रम अस्तित्त्वात आणणे व यशस्वी करणे म्हणजे उद्योजकता होय.''

ही उद्योजकता कोणत्याही क्षेत्रातील असू शकते. उदाः शेती, व्यापार, शिक्षण, वैद्यकिय, सेवा, प्रशासन, संरक्षण व उपयोजित कला इ.

- **उद्योजकता ही सर्वच क्षेत्रात :**

उद्योजकतेविषयी एक गैरसमज होण्याची दाट शक्यता असते. हा गैरसमज म्हणजे उद्योजकता ही केवळ उद्योगाशी संबंधित असते. वास्तविक उद्योजकता कोणत्याही क्षेत्रात असू शकते. दुरदृष्टीने सर्वंकष विचार करून काही नवनिर्मिती करणा-यांमध्ये, उपक्रम करणा-यांमध्ये उद्योजकता आहे असे आपण म्हणू शकू. उद्योजकाच्या कृतीमुळे कुणाचे तरी हित साधणे, संसाधनांचा सुयोग्य वापर करणे अपेक्षित आहे. उद्योजकता ही काही ठराविक क्षेत्राची मक्तेदारी नाही, सुशिक्षित, अशिक्षित , श्रीमंत , गरीब हया सर्वांमध्येच ती असू शकते. नोकरी मिळत नाही म्हणून उद्योजक बना हा आणखी एक गैरसमज आहे.

म्हणजेच ''योजकता आणि उपक्रमशीलता यांचा सुरेख संगम म्हणजे उद्योजकता आणि हा संगम ज्या व्यक्तिमध्ये झालेला अहे अशी व्यक्ती म्हणजे उद्योजक. मग ती व्यक्ति कोणत्याही क्षेत्रातील असो.''

- **उद्योजकता लक्षणे :**

1. कुणाचे तरी हित साधते.
2. संसाधनांचा सुयोग्य वापर
3. ठराविक वर्गाची मक्तेदारी नाही.
4. नोकरी मिळत नाही म्हणून उद्योजक बनता येत नाही.
5. उद्योजकतेमध्ये व्यापारी वृत्तीसाठी आवश्यक असणारे गुण असावेच लागतात.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

6. नवनिर्मिती, नित्य परंपरेपासून काही वेगळे करून दाखविण्याची निकोप इर्ष्या ही असावी लागते.

7. नवनिर्मिती व उद्योगविषयक ज्ञान यांची निकोप सांगड हाच उद्योजकतेचा अविष्कार होय. इ.

- **उद्योजकता शिक्षण :**

उद्योग अथवा व्यवसाय करण्याकरिता आवश्यक असणारी मनोभूमिका विद्यार्थ्यांमध्ये तयार करून एखादा उद्योग कसा करावा, यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन व प्रशिक्षण सामान्य अभ्यासक्रमाच्या बरोबरीने पुरविणे म्हणजे उद्योजकता शिक्षण होय.

- **डेलॉर्स कमिशन व जीवनकौशल्ये आणि उद्योजकता विकास परस्पर सहसंबंधः**

21 व्या शतकातील शिक्षणासंदर्भात विचार करण्यासाठी 1992 साली डेलॉर यांच्या अध्यक्षतेखाली जो आयोग नेमण्यात आला होता त्या आयोगाच्या शिफारशींनुसार या शतकातील शिक्षणाची चार उद्दिष्टे मांडली ती खालीलप्रमाणेः

1. सार्वत्रिक समूहाच्या कल्पनेचा विकास
2. स्थानिक समाजाकडून वैश्विक समाजाकडे
3. सामाजिक सहभागातून लोकशाही सहभागाकडे
4. मानवी विकासासाठी आर्थिक विकास

वरील उद्दिष्टपूर्तीसाठी डेलॉर व त्यांचे सहकारी यांनी या अहवालात शिक्षणाचे चार स्तंभ मांडले ते खालीलप्रमाणे :

1. ज्ञानसाधनेसाठी अध्ययन
2. आत्मशोधनासाठी अध्ययन
3. कृतीसाठी अध्ययन
4. सहजीवनासाठी अध्ययन

यातील कृतिसाठी अध्ययन ; हा शिक्षणाचा एक प्रमुख आधारस्तंभ होय. व उद्योजकता शिक्षण हा त्याचाच एक भाग आहे.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

तसेच याच आधारस्तंभातील पहिला व चौथा हे दोन स्तंभ ; जीवनकौशल्यांच्या शिक्षणास मार्गदर्शक ठरत असलेले आपणास दिसून येतात.

- **जीवनकौशल्ये व शिक्षणाचे चार स्तंभ एकमेकांस परस्परपूरक :**

जीवनकौशल्ये या संकल्पनेतून डेलॉर्स कमिशनला अपेक्षित असलेला ज्ञानाधिठित,कृतीयुक्त व सहजीवनवादी समाज घडू शकतो व हे दोन्ही घटक एकमेकांना व उद्योजकता विकासास पूरक असलेले आपणाला खालील वर्गीकरणाने स्पष्ट होईल.

- **अ . ज्ञानसाधनेसाठी अध्ययन ;**

1. निर्णयक्षमता
2. चिकित्सक विचार
3. सर्जनशील विचार
4. समस्या निराकरण इ.

- **ब. आत्मशोधनासाठी अध्ययन ;**

1. स्वः ची जाणीव
2. स्वाभिमान
3. आत्मविश्वास
4. समायोजन कौशल्ये इ.

- **सहजीवनासाठी अध्ययन**

1. आंतरमानवीय निकोप सहसंबंध
2. परिणामकारक संप्रेषण
3. नकार देण्याची कौशल्ये
4. सहसंवेदना कौशल्ये इ.

- **ड. कृतीसाठी अध्ययन ;**

1. मानसिक शक्तीचां / कौशल्यांचा विकास
2. कृतीकौशल्यांचा विकास

अशा प्रकारे जीवनकौशल्यांच्या शिक्षणाला शिक्षणाच्या चार स्तंभाचा आधार असून त्या उद्दिष्टपूर्तीसाठी विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या अंगी रूजविली गेली तर आपोआपच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होउन त्याच्या उद्योजकीय व्यक्तिमत्त्व विकासास वाव मिळेल. तो कसा ते आपण खालील गुणांआधारे पाहू.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

- **यशस्वी उद्योजकतेसाठी आवश्यक गुण :**

यशस्वी उद्योजकतेसाठी डॉ. श्री. वि. कडवेकर यांनी आपल्या व्यावसायिक पर्यावरण व उद्योजकता या ग्रंथात यशस्वी उद्योजकतेसाठी आवश्यक असणारे दिलेले गुण खालीलप्रमाणे :

1. नवीन शोध लवण्याची वृत्ती
2. योग्य आणि वाजवी जोखीम पत्करण्याची वृत्ती
3. सिध्दीप्रेरणा
4. मगील अनुभवांवरून शिकणे
5. व्यावसायिक पर्यावरणाबाबत जागरूकता
6. उत्पादन संसाधने संपादन करण्याचे कौशल्य
7. कालबध्दता
8. अनुकरणप्रियता
9. आनंदी,उत्साही वृत्ती
10. चौकसवृत्ती व जागरूकता
11. प्रामाणिकता व निष्ठा
12. प्रभावी व्यक्तीमत्त्व
13. सकारात्मकता
14. सर्वप्रथम जबाबदारी घेण्याची वृत्ती
15. उत्तम अर्थव्यवस्थापक
16. सतत शिकण्याची वृत्ती
17. दूरदृष्टी
18. चांगला श्रोता
19. अपयश पचविण्याची ताकद
20. जिद्दीपणा
21. संधीबाबत जागरूकता
22. वाटाघाटीचे कौशल्य

यशस्वी उद्योजकतेसाठी आवश्यक गुण -कौशल्ये जीवनकोशल्यांद्वारे विकसित केली जाउ शकतात ती खालीलप्रमाणे :

- **जीवनकौशल्यांद्वारे उद्योजकता कौशल्यांचा विकास :**

शालेय शिक्षणात आज जीवनकौशल्यांचा समावेश करण्यात आलेला असून ही जीवनकौशल्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात प्रमुख भूमिका करताना आपणास दिसतात. याच जीवनकौशल्यांच्या शिक्षणातून अनेक प्रकारची कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये आपण रूजवू शकतो.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

प्रत्येक क्षेत्राशी निगडीत असलेली उद्योजकता कौशल्ये जीवनकौशल्यांद्वारे शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करू शकतात.

आजचा विद्यार्थी उद्याचा भावी नागरिक बनणार असतो. जीवनचरितार्थासाठी तो कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात स्वतःला झोकून देणार असतो. या क्षेत्रात त्याला यशस्वी बनण्यासाठी लागणारी आवश्यक कोशल्ये विकसित करण्याचे कार्य हे शिक्षणाचे असून ते जीवनकौशल्यांद्वारे अधिक चांगल्या प्रकारे विकसित करता येईल.

**1. स्वःची जाणीव/स्वयंजागृती :**

''स्वः ची जाणीव किंवा स्वयंजागृती म्हणजे स्वतःच्या भावना, अभिरूची,बलस्थाने,क्षमता,मर्यादा, उणीवा यांची स्वतःला जाणीव असणे. यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो''.

1. स्वःताची योग्यता जाणणे.
2. स्वःक्षमतांचे वास्तव मूल्यमापन.
3. निर्णय घेण्यासाठी भावनांमधील प्राधान्यतेचा क्रम लावणे.
4. अनिश्चितता व तणावपूर्ण परिस्थितीतही पूर्ण आत्मविश्वास असणे.

प्रत्येक व्यक्तीमध्ये सुप्त शक्तींचा प्रचंड सठा असतो. मात्र त्याबाबतची जाणीव त्याला नसते. हयाच सुप्त शक्तींची जाणीव तयाला करून देणे गरजेचे असते

उद्योजकतसाटी व्यक्तिमत्त्व तयार करताना या जीवनकौशल्यास समोर ठेवून विद्यार्थ्यांच्या वआवडत्या क्षेत्राशी संबंध्ति आवश्रूयक कौशल्ये निर्माण करण्याआधी त्याच क्षमता , मर्यादा, अभिरूची, बलस्थाने यांची त्याला जाणिव करून देणे गरजेचे आहे. व यासाठी ''शत्रुसंधो'' पृथक्करण उपपत्तीचा चांगला उपयोग होउ शकतो.

अ. बलस्थाने ब. त्रुटी क. संधी ड. धोके.

**2. सहसंवेदना/ समानानुभूतीः**

समानानुभूती /सहसंवेदना म्हणजे सहानुभूती नव्हे तर इतर व्यक्तींनी दुस-या व्यक्तिच्या भूमिकेतून त्याच्या भावभावनांना जाणून घेण्याची प्रक्रिया होय.

समानानुभूती या जीवनकौशल्यात खालील बाबींचा समावेश होतोः-

1. इतरांच्या भावना, गरजा,चिंता,ध्येये,सामर्थ्यव मर्यादांची त्यांच्या भूमिकेतून जाणीव ठेवणे.
2. इतरांच्या दृष्टिकोनातून परिस्थितीचा अंदाज घेणे.
3. व्यक्ति भिन्नतेची जाणीव ठेवणे.
4. इतरांशी सहयदयता व संसंवाद साधता येणे.

वरील कौशल्ये उद्योजकता विकासासाठी या जीवनकौशल्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये रूजविली तर तो विद्यार्थी पुढे आपल्या कार्यक्षेत्रात यशस्वी उद्योजक बनू शकेल. व यातूनच पुढे निकोप आंतरमानवीय संबंधांना बळकटी मिळेल. यासाठी त्याने आपल्याशी संबंधित असणा-या प्रत्येक व्यक्तीच्या संदर्भात काळजीपूर्वक व त्याच्या दृष्टिकोनातून समजून घेतले पाहिजे त्यासाठी योग्य असे प्रसंग शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर मांडणे व त्यावर विद्यार्थी कसा विचार करतात ते पाहून समानानूभूतीने वागणे म्हणजे काय? व त्यासाठी आवश्यक कोणते? हे गुण आपल्याकडे असण्े का गरजेचे आहे , जीवनात यामुळे कोणकोणते फायदे होतात ते समजून दिल्यान उद्योजकतेसाठी योग्य त्या गुणांची पायाभरणी येथेच होताना दिसते.

**3. समस्यानिराकरण;**

''दैनंदिन जीवनात येणा-या विविध समस्या सोडविताना त्यावर उपलबध असणा-या पर्यायांपैकी सर्वात्तम पर्याय निवडून अचूक कृती करणे म्हणजेच समस्या निराकरण होय''.

शिक्षकांनी देनंदिन जीवनात येणा-या विविध समस्या विद्यार्थ्यांसमोर मांडल्या व त्या सोडविण्यास सांगितल्या असता विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना मिळून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा उद्योजकीय दृष्टिकोंनातून आपोआप विकास होईल. यामुळे विद्यार्थी भावी जीवनात आत्मविश्वासाने , आत्मनिर्भरतेन, स्वतंत्रपणे कोणताही ताण न घेता स्वतःच्या समस्या स्वतः सोडविण्यास तयार होईल. समस्या कशा सोडवावयाच्या, हे शिकेल.यातूनच आजचा विद्यार्थी उद्या त्याच्या कार्यक्षेत्रात यशस्वी उद्योजक होईल.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**4. निर्णयक्षमता:**

दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी सर्व पर्यायांचा विचार करून त्यापैकी योग्य पर्याय निवडण्याची क्षमता म्हणजेच निर्णयक्षमता होय'

निर्णयक्षमता म्हणजे सारासार विचारानंतर एखादी गोष्ट करण्याचा केलेला निश्चय. उदाः 10 वी-12वी नंतर करिअरची निवड करतानाचा निर्णय.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर विविध दैनंदिन जीवनात भेडसावणा-या समस्या विद्यार्थ्यांसमोर मांडून त्या सोडविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. या समस्या सोडविताना अनेक उपलब्ध पर्यायांपैकी विद्यार्थ्यी आपोआप निर्णय घेण्याची कौशल्ये आत्मसात करतील यातूनच पुढे यशस्वी उद्योजकास आवश्यक असणारे निर्णयक्षमता हे कौशल्य त्याच्यामध्ये रूजविले जाईल.

**5. सर्जनशील विचार;**

''पारंपरिक पद्धतीपेक्षा वेगळया , नाविण्यपूर्ण व योग्य रितीन आपल्या भवना,विचार,कल्पना मांडणे किंवा समस्या सोडविण्याची क्षमता म्हणजे सर्जनशीलता होय''.

यशस्वी उद्योजकतेसाठी नाविण्यपूर्ण विचार , कृती ही खूपच महत्वाची असल्याने भवी आयुष्यात एक चांगला उद्योजक म्हणून नावलौकिक मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांची पायाभरणी या जीवनकौशल्याद्वारे होत असलेली आपणाला दिसून येते.आणि यातूनच स्वः , समाज, व राष्ट्राची प्रगती वेगाने होण्यास मदत होईल.

**6. चिकित्सात्मक विचार;**

''मिळविलेल्या किंवा प्राप्त माहितीचे, अनुभवांचे, घटना , प्रसंगांचे स्वतःच्या क्षमतेनुसार वस्तूनिष्इ स्वरूपात सूक्ष्म निरीक्षण, चिंतन व परीक्षण करण्याच्या क्षमता म्हणजे चिकित्सात्मक विचार होय''.

दैनंदिन जीवनातील घटना,प्रसंग,अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडून त्यापाठीमागील कारणांचा चिंतन,मनन, तर्क, अनुमान, विश्लेषणाद्वारे शोध घेण्यासाठीच्या सवयींचा विकसा करणे गरजेचे

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

आहे. यातूनच उद्योजकता विकासात वेळोवेळी घ्यावे लागणारे किचकट निर्णय घेण्यास विद्यार्थी सक्षम बनेल.

**7. परिणामकारक संप्रेषण;**

''व्यक्ती दैनंदिन जीवनात कुटूंब, मित्र समाजात वावरत असताना स्वतःच्या भावना, कल्पना व विचाराची प्रभवी व अर्थपूर्णरित्या अभिव्यक्ती म्हणजे परिणामकारक संप्रेषण होय''.

प्रत्येक व्यक्तिला जीवन जगताना कोणते तरी कार्यक्षेत्र हे निवडावेच लागते, व तेही समाजात राहूनच . मनुष्य समाजाशिवाय एकटा जगू शकत नाही. उद्योजकीय दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांना आपले मतप्रदर्शन, विचार,भावना,कल्पना योग्य पध्द्तीने इतरांपर्यंत योग्य पध्द्तीने, कमीत कमी वेळ, श्रम व पैसा याद्वारे पाठविता येईल यासाठी आवश्यक कौशल्ये शालेय जीवनातून विकसित करणे गरजेचेआहे. ज्यामुळे विद्यार्थी भावी जीवनात आपल्या उद्योजकीय जीवनात यशस्वीपणे संप्रेषण करू शकेल.

**8. निकोप आंतरमानवीय संबंध;**

''जीवनात येणा-या प्रत्येक व्यक्तिशी आपले संबंध निकोप ठेवतायेण्यासाठी आवश्यक कौशल्य विकसित करणे''.

उदा : परस्पर सहकार्याची भावना, इतरांच्या विचारांचा आदर, समाधानकारक वर्तन, ताण-तणावांपासून मुक्त असणे इ. बाबी आंतरमानवीय संबंधात येतात. यामुळे प्रतिकूलतेवर अनुकूलतेची मात होते.

उद्योजकतेसाठी आवश्यक कौशल्यांच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास यशस्वी उद्योजक होण्यासाठी विपू लोकसंग्रहाची , निकोप संबंधांची गरज असते. व हा लोकसंग्रह व सहसंबंध सखोल निर्माण करण्यासाठी या जीवनकौशल्याचा मोठया प्रमाणात उपयोग होईल. शिक्षकांनी यासाठी विविध सहशालेय उपक्रमांचे तसेच गट कार्य, समूह कार्यासाठीच्या उपक्रमांवर भर देउन विद्यार्थ्यांच्या आंतरमानवीय संबंध विकासास वाव देणे गरजेचे आहे.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**9. भावनांचे समायोजन ;**

''स्वतः व इतरांच्या भावना जाणून घेता याव्यात व त्यामुळे स्वतःच्या वर्तनावर होणरा परिणाम लखत घेउन गरजेप्रमाणे ीावनांचे याग्य नियंत्रण व व्यवस्थापन करणे म्हण्सजेच भावनांचे समायोजन होय''.

विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच याबाबत योग्य ते प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. सन 2010 या वर्षाच्या केवळ तीन महिन्यातच जवळजवळ 100 पेक्षाही जास्त विद्यार्थ्यांनी शालेय अभ्यासाच्या ताणतणांवांमुळे आत्महत्या केल्या. या आत्महत्यांच्या सत्रामुळे संपूर्ण समाजव्यवस्था, पालक, शिक्षक, संस्थाचालक, शासन, शिक्षण, समाज,मानसतज्ञ हादरून गेले. कारण विद्यार्थ्यांमध्ये भावनिक अस्थिरतेची एक लाटच निर्माण झाली होती. व याची कारणे तपासून पाहिली तर ती शिक्षणप्रक्रियेत आढळली.

देशाचा भावी नागरिक घडविताना या राष्ट्राच्या अमूल्य संपत्तीचा ठेवा जपण्यासाठी त्यांना योग्य अशा भावनिक समायोजन कौशल्यांचे शिक्षण शालेय शिक्षणातूनच दिले तर उद्या हा विद्यार्थी आपल्या उद्योजकीय क्षेत्रातील ताण-तणांवांच्या क्षणांना समर्थपणे सामोरा जाउ शकेल.

**10. ताण-तणांवांचे समायोजन;**

''स्वतःवरील ताण-तणावांच्या कारणांचा शोध घेउन ताण-तणावामुळे मानसिक व शारिरीक आरोग्यावर होणरा परिणाम टाळता येणे म्हणजे ताण-तणावांचे समायोजन होय''.

विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच ताण-तणांवाचे व्यवस्थापन कसे करावयाचे याविषयी योग्य त्या अनूभुती दिल्या तर पुढे जाउन यशस्वी उद्योजक बनयासाठी हे जीवनकौशल्य खूप मोलाची मदत करेल. भवी उदयोजकीय जीवनात येणा-या विविध समस्या, तीव्र स्पर्धा, जोखीम इ. मुळे वाढत जाणारा ताण कमी करण्यासाठी मनोरंजन, पर्यटन, मनमोकळया गप्पा , कुटूंबातील व्यक्तींशी, मित्रांशी हितगूज इ. बाबींचे महत्त्व पटवून देणे. त्याबरोबर योगा , प्राणायाम, व्यायाम,

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सूर्यनमस्कार, कोणत्याही एका खेळाला दैनंदिन जीवनात महत्त्व, विविध छंद जोपासणे इ. बाबींचे जीवनातील महत्त्व पटवून दिल्याने विद्यार्थ्यांच्या यशस्वी उद्योजकत्वाचा विकास होईल.

अशा प्रकारे जीवनकौशल्यांद्वारे शालेय जीवनापासून ते विद्यापीठीय शिक्षणापर्यंतच्या शेक्षणिक प्रवासातून वैयक्तिक , सामाजिक व राष्ट्ीय विकासाचा एक भक्कम व समर्थ आधारस्तंभ तयार होईल. जो जागतिकीकरणाच्या या तीव्र स्पर्धेत आपआपल्या आवडत्या क्षेत्रात एक यशस्वी उद्योजक म्हणून नावारूपाला येवून सर्वांगीन प्रगतीचा शिलेदार बनेल. व डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलामांनी पाहिलेले स्वप्न प्रत्येक भारतीय प्रत्यक्षात जगू शकेल.

- **संदर्भः**

*डॉ. रमा भोसले, डॉ. उज्ज्वला डोणे, ;जाने 2009 , शिक्षणातील बदलते विचारप्रवाह, फडके प्रकाशन , कोल्हापूर.*

*डॉ. श्री.वि. कडवेकर.,प्रा. रवींद्र कोठावदे., ;सप्टे. 2008 ''व्यावसायिक पर्यावरण आणि उद्योजकता'', डायमंड पब्लिकेशन, नारायण पेठ , पुणे.*

*शिक्षण तरंग, डॉ. किशोर चव्हाण., ;जाने. 2010, फेब्रु.2010, इनसाईट पब्लिकेशन, गंगापूर रोड नाशिक.*

*शिक्षण संक्रमण ;ऑक्टा.े 2009*

*मराठी बालभारती, इयत्ता 7 वी. , ;मे 2008द्द महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ , पुणे.*

*मराठी बालभारती, इयत्ता 8 वी. , ;जाने 2009 महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ , पुणे.*

- **पाठयपुस्तके :**

*कुमारभारती मराठी, इयत्ता नववी, व्यक्तिमत्त्व विकास, (मे 2008), महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.*

*बालभारती मराठी, इयत्ता सातवी, ( मे 2008), महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - 04.*

*बालभारती मराठी, इयत्ता आठवी, ( जाने. 2009), महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे .*

- **शिक्षक मार्गदर्शिका :**

*महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, ''जीवनकौशल्ये शिक्षण, शिक्षक मार्गदर्शिका भाग एक व दोन,(2011, जून), पूणे,युनिसेफ.*

*महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिशद,'' सातत्यपूर्ण सर्वंकश मूल्यमापन '' , (2010, सप्टे.), पूणे,*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- **शैक्षणिक मासिके : -**

*पाटील व्ही.एन व चटटे आर.व्ही.,(ऑक्टो. 2009),''जीवन कौशल्यांसाठीचे शिक्षण ,शिक्षण समीक्षा. 122-125*
*पाटील शोभा,(ऑक्टो. 2009),''जीवनकौशल्ये यशस्वी जीवन जगण्याची कला , शिक्षणातील संक्रमण.29-31.*
*राजपूत के.डी.,(2010,फेब्रु.),''ज्ञानरचनावादातून जीवन कौशल्यांचे शिक्षण',शिक्षण तरंग. 4 - 6.*
*साळी व.झा.,(2010, डिसें.),''जीवनकेंद्री शिक्षणासाठी जीवनकौशल्ये शिक्षण', शिक्षण तरंग.*
*www.ericdatabase.com*
*www.who.com*
*www.google.com*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*